राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक प्राथम्य**

क्रमांक रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.०३/का.०६,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०९/११/२०२१.

**प्रति,**
**जिल्हाधिकारी,**
**पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पुणे,**
**सोलापूर, सांगली, सातारा, अहमदनगर, जळगांव,**
**जालना, नांदेड, वाशिम, यवतमाळ व चंद्रपूर. (एकूण १५)**

**विषय :- माहे डिसेंबर २०२१ मध्ये मुदत संपणाऱ्या १७, मुदत समाप्त झालेल्या २ व ७ नवनिर्मित अशा २६ नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०२१.**

**संदर्भः-** १) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१/का-६, दि.०६/०२/२०२० चे आदेश.
२) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश क्र.६, दि.०१/१०/२०२१.

महोदय/महोदया,

राज्यातील माहे डिसेंबर २०२१ मध्ये मुदत संपणाऱ्या १७, मुदत समाप्त झालेल्या २ व ७ नवनिर्मित अशा २६ नगरपंचायतींच्या (सोबत परिशिष्ट-२) सार्वत्रिक निवडणुका अधिनियमातील तरतुदीनुसार घेणे आवश्यक आहे.

२. महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ९ (२) मधील तरतुदींनुसार उपरोक्त नगरपंचायतींची सदस्य संख्या संबंधीत विभागीय आयुक्त यांनी शासन राजपत्रात प्रसिध्द करावी.

३. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या आरक्षणाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये श्री. विकास गवळी यांनी महाराष्ट्र शासनाविरुध्द दाखल केलेल्या रिट पिटीशन (सिव्हील) क्रमांक ९८०/२०१९ मध्ये मा. न्यायालयाने दि.०४/०३/२०२१ रोजी दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने राज्य शासनाने

दि.०१/१०/२०२१ रोजी महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश-२०२१, प्राख्यापित केला आहे.

४. आणि ज्याअर्थी, शासनाने दि.०१/१०/२०२१ महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश-२०२१, प्राख्यापित केला आहे. त्यानुसार नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, नगरपंचायतीतील थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील, आणि एकूण आरक्षण नगरपरिषदेतील एकूण जागांच्या ५० टक्यांपेक्षा अधिक असणार नाही. परंतु अशाप्रकारे राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक द्वितीयांश जागा, नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील.

नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभाग रचना करण्याबाबत आयोगाने वेळोवळी दिलेल्या सूचना, मार्गदर्शक तत्व व नियमांचे तंतोतंत पालन करावे. नगरपंचायतींच्या प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करताना उक्त अध्यादेशाच्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन होईल, याची दक्षता घ्यावी. आरक्षण देताना सन २००५ पासून झालेल्या निवडणुकांमधील आरक्षण विचारात घेवून त्यानुसार आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे बंधनकारक आहे.

५. आता या पत्राद्वारे माहे डिसेंबर २०२१ मध्ये मुदती संपणाऱ्या १७, मुदत समाप्त झालेल्या २ व ७ नवनिर्मित अशा एकूण २६ नगरपंचायतींच्या (सोबत परिशिष्ट-२) सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम **परिशिष्ट-१** नुसार देण्यात येत आहे. **प्रभाग रचनेसाठी आवश्यक असलेले आदेश/परिपत्रक राज्य निवडणूक आयोगाच्या** https://www.mahasec.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.**

६. प्रभाग रचना अंतिम करण्याबाबतचे यापूर्वीचे संबंधित आदेश अधिक्रमित करुन राज्य निवडणूक आयुक्त यांनी त्यांचे अधिकार रानिआ आदेश क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१-अ/का.६, दि.०६/०२/२०२० अन्वये **संबंधित मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांना प्रदान केले आहेत.**

७. प्रभाग रचनेचे तीन मुख्य टप्पे राहणार आहेत:-

(अ) आरक्षणासह प्रारुप प्रभाग रचना करणे,

(ब) हरकती व सूचनांवरील सुनावणी घेणे व

(क) अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करणे.

८. प्रभाग रचना करताना प्रामुख्याने खालील बाबींवर लक्ष देणे आवश्यक आहे. :-

(i) **राज्य निवडणूक आयोगाकडे आपणाकडून प्राप्त झालेल्या माहिती नुसार परिशिष्ट-२** मध्ये नमूद केल्यानुसार मुदत समाप्त होणाऱ्या १७, मुदत समाप्त झालेल्या २ व ७ नवनिर्मित अशा एकूण **२६** नगरपंचायतींची माहिती आपल्याकडून प्राप्त झालेली आहे. याबाबत आपल्या स्तरावर पुन्हा खात्री करण्यात यावी. त्यामध्ये त्रुटी/तफावत असल्यास ती राज्य निवडणूक आयोगास तात्काळ कळविण्यात यावी.

(ii) या निवडणुकांकरिता जनगणना कार्यालयाची सन २०११ च्या जनगणनेची आकडेवारी वापरण्यात यावी. तसेच **आयोगाच्या दि.०६/०२/२०२० च्या आदेशा सोबतच्या परिशिष्ट-९ मधील नमुन्यानुसार नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र घेण्यात यावे.**

(iii) प्रभाग रचना करताना गुगल मॅप वापरुन, त्यावर प्रगणक गट दर्शविण्यात यावेत.

(iv) मुख्याधिकारी यांनी अनुसूचित जातीच्या/अनुसूचित जमातीच्या आरक्षणासह प्रारूप प्रभाग रचना प्रस्ताव तयार करावा.

(v) अनुसूचित जाती मधील महिला, अनुसूचित जमातीमधील महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिला व सर्वसाधारण महिला याकरिता सोडत, जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार काढावी. नव्याने स्थापन होणाऱ्या नगरपंचायतीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी एकच जागा अनुज्ञेय होत असल्यास ती जागा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या महिलांसाठी आरक्षित होईल किंवा कसे? हे सुध्दा सोडत पध्दतीने ठरविण्यात यावे. मागील निवडणुकीत जर ती जागा अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातींच्या महिलांसाठी आरक्षित असेल तर ती जागा आता महिलांसाठी आरक्षित होणार नाही. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी मागील व आगामी होणाऱ्या निवडणुकीसाठी एकच जागा अनुज्ञेय होत असल्यास, मागील निवडणुकीत जर ती

जागा त्या जाती/ जमातीच्या महिलेसाठी आरक्षित असेल, तर ती जागा आगामी होणाऱ्या नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी संबंधित प्रवर्गातील महिलेसाठी आरक्षित होणार नाही. तसेच मागील निवडणुकीत जर ती जागा त्या जाती/ जमातीच्या महिलेसाठी आरक्षित नसेल, तर ती जागा आगाती होणाऱ्या निवडणुकीसाठी संबंधित प्रवर्गातील महिलेसाठी थेट आरक्षित होईल.

(vi) सोडतीसाठी, फिरणारा पारदर्शक ड्रम/काचेचा बॉक्स वापरावा व त्यामध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार कमीत कमी A4 या आकाराचा असावा. चिठ्ठीवरील अनुक्रमांक बाहेरुन दिसणार नाहीत याची दक्षता घ्यावी. त्यावर लावावयाचे रबर बँड एकाच रंगाचे असावेत. शक्य असल्यास सोडतीचे थेट प्रक्षेपण स्थानिक केबल टि.व्ही. वर करावे.

(vii) प्रभागरचना आणि **आरक्षण** राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१/का.६, दिनांक ०६/०२/२०२० नुसार करावी. या आदेशानुसार विहित केलेल्या परिशिष्ट १ ते ८ नुसारची माहिती तयार करुन ती सर्व जनतेच्या निदर्शनास आणण्याकरिता आवश्यक ती उपाय योजना करावी.

(viii) सदस्य पदाच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस, मतदारांच्या माहितीसाठी हरकती व सूचना, अंतिम प्रभाग रचना इत्यादी याकरिता मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी. उदा.

(a) स्थानिक वृत्तपत्रे, केबल टी.व्हि. वर
(b) नगरपंचायतींच्या प्रभाग समितीचे व इतर कार्यालयातील सूचना फलक,
(c) जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयाचे सूचना फलक
(d) स्थानिक पातळीवर इतर माध्यमे.
(e) जिल्हाधिकारी व नगरपंचायतीच्या संकेत स्थळावर इत्यादी

(ix) प्रारूप प्रभाग रचना व अंतिम प्रभाग रचना जिल्हाधिकारी व नगरपंचायतीच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

(x) सोडतीच्यावेळी प्रारुप प्रभाग रचनेचा नकाशा व त्याच्या चतुःसिमा, सोडतीसाठी येणाऱ्या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावून ठेवावा.

(xi) सोडत, जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली होईल. प्रभाग रचना, आरक्षण व सोडत इत्यादी

पासून अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कार्यवाहीवर नियंत्रण ठेवण्याकरीता **उपजिल्हाधिकारी** दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी. सोडतीची रंगीत तालीम **फक्त संबंधीत अधिकारी व कर्मचारी** यांचे उपस्थितीत घ्यावी.

९. मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात दाखल रिट याचिका क्र.११७४४/२०२१ द्वारे राज्य शासनाने दि.२३/०९/२०२१ रोजी पारित केलेला अध्यादेश क्र.३/२०२१ आव्हान देण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सदर प्रकरणात न्यायालयाने दि.२२/१०/२०२१ रोजी दिलेल्या आदेशानुसार आयोगातर्फे करण्यात येणारी सर्व कार्यवाही ही उक्त नमूद याचिकेतील निर्णयाच्या अधीन राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

१०. राज्यामध्ये कोरोना विषाणूची (कोव्हीड-१९) महामारी सुरु असल्याने केंद्र व राज्य शासनाने ठरवून दिलेल्या निकषांचे तंतोतंत पालन करुन नमूद नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०२१ राबवतेवेळी आवश्यक त्या उपाय योजना राबविण्यात याव्यात.

११. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक तसेच ई-मेल पुढीलप्रमाणे आहे:-

दूनध्वनी क्रमांक :- २२०४५०७५ / २२०२७७३७ / २२८४६७२०
ई-मेल :- sec.mh@gov.in

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

सहपत्र- परिशिष्ट-१ व २

प्रत:-

१. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
३. सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन (सर्व)
४. संबंधित नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने
६. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील
७. निवड नस्ती/कार्या.६

# प्रभाग रचना, आरक्षण व सोडत कार्यक्रम

## परिशिष्ट -१

**माहे डिसेंबर २०२१ मध्ये मुदत संपणाऱ्या १७, मुदत समाप्त झालेल्या २ व नवनिर्मित ७ अशा एकूण २६ नगरपंचायतींसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम -२०२१.**

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२१/प्र.क्र. ३ /का-०६, दि. ०९/११/२०२१ सोबतचे परिशिष्ट.)

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (नगर पंचायतीच्या प्रभागांची संख्या, त्यांची प्रभागनिहाय एकूण व अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमातीची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या, क्षेत्र, सीमांकन, नकाशा, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आरक्षण यासह) **जिल्हाधिकारी** यांचेकडे सादर करणे | मुख्याधिकारी | १०/११/२०२१ (बुधवार) (पर्यंत) |
| २. | प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे. | जिल्हाधिकारी | ११/११/२०२१ (गुरूवार) (पर्यंत) |
| ३. | सदस्य पदांच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस प्रसिध्द करणे **(जिल्हाधिकारी व नगरपंचायतीच्या वेबसाईटसह)** | जिल्हाधिकारी | ११/११/२०२१ (गुरूवार) |
| ४. | नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत काढणे. (अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिला) | मुख्याधिकारी | १२/११/२०२१ (शुक्रवार) |
| | **ब) हरकती व सूचना तसेच सुनावणी** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे व सदस्य पदांच्या आरक्षणाची (अधिसूचना कलम १० नुसार) रहिवाश्यांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सूचना मागविणेकरिता वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपंचायतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | १२/११/२०२१ (शुक्रवार) पर्यंत |
| २. | हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | | १२/११/२०२१ (शुक्रवार) ते १६/११/२०२१ (मंगळवार) पर्यंत |
| ३. | प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे. | जिल्हाधिकारी | १७/११/२०२१ (बुधवार) पर्यंत |
| ४. | हरकती व सूचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन संबंधित **विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन,** यांचेकडे अहवाल पाठविणे | जिल्हाधिकारी | १८/११/२०२१ (गुरूवार) पर्यंत |
| ५. | अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे. | संबंधित विभागीय आयुक्त | २२/११/२०२१ (सोमवार) पर्यंत |

| क) अंतिम प्रभाग रचना<br>(प्रभाग निहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या तसेच आरक्षणासह) | | | |
|---|---|---|---|
| १. | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसूचना वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपंचायतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | २३/११/२०२१ (मंगळवार) पर्यंत |

टीपः- प्रत्येक नगरपंचायतीची प्रभाग रचना, आरक्षण व सोडत इत्यादी ते अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कामावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारीपेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी.

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

# परिशिष्ट- २

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.३/का-६, दि.०९/११/२०२१ सोबतचे सहपत्र.)

| अ.क्र. | जिल्हा | नगरपंचायतींचे नावे | नगरपंचायतींच्या मुदत समाप्तीचा व नवनिर्मितीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | यवतमाळ | झरी जामणी | २६/११/२०२० |
| २ | वाशिम | मालेगाव | ०७/०२/२०२१ |
| ३ | सातारा | कोरेगाव | १८/१२/२०२१ |
| ४ | सातारा | वडूज | १८/१२/२०२१ |
| ५ | सातारा | खंडाळा | १८/१२/२०२१ |
| ६ | सातारा | दहीवडी | १८/१२/२०२१ |
| ७ | पालघर | तलासरी | २२/१२/२०२१ |
| ८ | पालघर | विक्रमगड | २२/१२/२०२१ |
| ९ | पालघर | मोखाडा | २२/१२/२०२१ |
| १० | सिंधुदुर्ग | देवगड-जामसंडे | २२/१२/२०२१ |
| ११ | जळगाव | बोदवड | २२/१२/२०२१ |
| १२ | सांगली | कवठे महांकाळ | २२/१२/२०२१ |
| १३ | सांगली | कडेगाव | २२/१२/२०२१ |
| १४ | सांगली | खानापूर | २२/१२/२०२१ |
| १५ | रत्नागिरी | दापोली | २५/१२/२०२१ |
| १६ | चंद्रपूर | सिंदेवाही-लोनवाही | २६/१२/२०२१ |
| १७ | अहमदनगर | शिर्डी | २७/१२/२०२१ |
| १८ | नांदेड | अर्धापूर | २९/१२/२०२१ |
| १९ | नांदेड | माहूर | २९/१२/२०२१ |
| २० | पुणे | देहू (नवनिर्मित) | ०८/१२/२०२० |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | रायगड | पाली (नवनिर्मित) | ३१/१२/२०२० |
| २२ | सोलापूर | महाळुंग-श्रीपूर (नवनिर्मित) | ०९/०३/२०२१ |
| २३ | पुणे | माळेगाव (बुद्रुक) (नवनिर्मित) | ३०/०३/२०२१ |
| २४ | सोलापूर | वैराग (नवनिर्मित) | १९/०५/२०२१ |
| २५ | जालना | तिर्थपुरी (नवनिर्मित) | ०२/०६/२०२१ |
| २६ | सोलापूर | नातेपुते (नवनिर्मित) | ०३/०८/२०२१ |